महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळाच्या शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांकः मासैनो-२०१९/ प्र. क्र. २००/२८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख: १७.०७.२०१९.

वाचा

१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.मासैनो २००५/६२२/प्र.क्र.११९/२८, दिनांक ११ जून, २०१०
२) महाव्यवस्थापक, महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्या. पुणे यांचे पत्र क्रमांक मेस्को/ शासन/ सामान्य, दिनांक २७ मे, २०१९.

प्रस्तावना:-

महाराष्ट्र राज्यातील सैन्यदलातील (भूदल, नौदल,वायुदल) निवृत्त होणाऱ्या माजी सैनिकांचे पुनर्वसन व्हावे आणि त्यांना निवृत्तीनंतर रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, उपजीविकेचे साधन उपलब्ध व्हावे म्हणून तसेच विविध योजनांची अंमलबजावणी अधिक परिणामकारकपणे करण्याकरिता महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. या महामंडळाच्या ठळक उद्दिष्टांपैकी माजी सैनिकांना सरकारी, निमसरकारी, शासकीय महामंडळे व प्राधिकरण व खाजगी संस्थांमध्ये सुरक्षा क्षेत्रात नोकऱ्या उपलब्ध करुन देणे हे एक उद्दिष्ट आहे. माजी सैनिकांबरोबरच त्यांच्या कुटुंबियांच्या पुनर्वसनाच्या दृष्टीने युध्द विधवांची मुले, युध्द विधवा, युध्दात अपंग झालेले सैनिक, इतर अपंग सैनिक, माजी सैनिकांच्या विधवा,माजी सैनिकांचे पाल्य,इत्यादीना सुध्दा रोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळाच्या मेमोरॅन्डम ऑफ असोसिएशनमध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे.

महामंडळाच्या सर्व व्यावसायिक उपक्रमांमध्ये माजी सैनिकांच्या पाल्यांना रोजगार पुरवितांना त्यांचे पाल्य कोणास मानावे या विषयी बरीच संदिग्धता निदर्शनास आली . यास्तव माजी सैनिकांच्या पाल्यांची पात्रता ठरविण्यासाठी त्यांचे मापदंड निश्चित करणे शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन निर्णय

मा. राज्यपाल महाराष्ट्र राज्य यांच्या मान्यतेने माजी सैनिकांच्या अवलंबितांसाठी खालीप्रमाणे पात्रता निश्चित करण्यात येत आहे.

१) माजी सैनिकांचा मुलगा ज्याचे वय भरतीच्या वेळी ३५ वर्षापर्यंत आहे. आणि त्याचा तपशील डिसचार्ज बुक मध्ये नमूद केलेला आहे. तसेच तो त्या माजी सैनिकावर अवलंबून असला पाहिजे.
२) माजी सैनिकांची अविवाहीत मुलगी, जिचे लग्न झालेले नाही व भरतीच्या वेळी ३५ वर्ष वया खालील असेल, त्याचा उल्लेख डिसचार्ज बुक मध्ये केलेला असावा, तसेच ती त्या माजी सैनिकावर अवलंबून असली पाहिजे.

३) मुलगा अथवा मुलीचा पार्ट दोन ऑर्डर चा उल्लेख डिसचार्ज बुक मध्ये नसल्यास पर्यायी कागदपत्रांचे निरिक्षण करुन जसे की आधार कार्ड, राशन कार्ड, व्होटर कार्ड, इत्यादी नुसार पात्रता ठरविण्यात यावी.

४) माजी सैनिकांच्या विधवा/विवाहीत /घटस्फोटीत मुलींना पाल्य मानले जाणार नाही.

५) माजी सैनिकांच्या पत्नीस व विधवेस नोकरीस पात्र मानले जाईल.

६) माजी सैनिकाने दत्तक घेतलेल्या मुलास अथवा मुलीस वरील १,२,३, व ४ मधील मापदंड अनुसार पाल्य मानले जाईल. अशा मुलांना/मुलींना दत्तक घेतल्याचे कायदेशीर दस्ताऐवज सादर करणे आवश्यक आहे.

२. एका ठिकाणी माजी सैनिकाच्या एकाच पाल्याला महामंडळाद्वारे नोकरी देण्यात येईल. त्या माजी सैनिकांचे इतर पाल्य असल्यास त्यांना दुसऱ्या जिल्हयात जागा उपलब्ध असतील तर महामंडळाद्वारे नोकरी देण्यात येइल वरील पात्रते प्रमाणे महामंडळाच्या सर्व व्यावसायिक उपक्रमांमध्ये सामाविष्ठ करण्याबाबत व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्या. पुणे यांनी त्वरीत कार्यवाही करावी.

सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७२२१६०२१०११०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Suresh Mahadeo Khade

Digitally signed by Suresh Mahadeo Khade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=14c299447f4a6e6c33ab3f7a85fbf010628981e82f8311a81d1cf974681485c2, serialNumber=f0b4c833a6fc7c6fb7cb0a96a3e2bb79d42d283b8f0f7bfc1ae95298d60bacf1, cn=Suresh Mahadeo Khade
Date: 2019.07.22 16:07:33 +05'30'

(सुरेश खाडे)

उप सचिव महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,

२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,

३. मा. मंत्री. (माजी सैनिक कल्याणप) यांचे खाजगी सचिव,

४. मा. राज्यमंत्री (माजी सैनिक कल्याण) यांचे खाजगी सचिव,

५. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ, रायगड, इमारत राष्ट्रीय युध्द स्मारकासमोर, सोलापूर रोड, घोरपडी, पुणे ४११००१,

६. संचालक, सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय, रायगड इमारत, राष्ट्रीय स्मारकासमोर, सोलापूर रोड, घोरपडी, पुणे ४११इ ००१,

७. सर्व जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी,

८. निवड नस्ती.